ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, ४ ऑक्टोबर, १९७२ | अंक १९

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळं मोकळं वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेंचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



Madison/TGM/7 Mar

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

**राजेशाही हॉटेलात बेडजवळ मद्यांच्या तोट्या —** वॉशिंग्टनजवळ गेथर्सबर्ग येथे एक नवे हॉटेल उघडण्यात आले आहे. तेथील मोटेल सूटमध्ये राहण्यास दररोज १,४०० डॉलर म्हणजे सुमारे १०,००० रुपये पडतात! ह्या सूटमध्ये तीन बेडरुम्स, चार बाथरुम्स, बेडजवळ वेगवेगळ्या मद्यांच्या तोट्या, इत्यादी सोयी आहेत. अन्न, पेय, मोटारहाक्यासह मोटार आणि दासींची २४ तास सेवा, ह्यांचा समावेश वरील बिलात आहे.

**क्रिकेटवीरांच्या फोटोंची नासधूस —** सिडने येथील क्रिकेट मैदानाच्या पॅव्हिलियनमध्ये चोर दारूचे साठे लांबविण्या-साठी शिरले, तेव्हा त्यांनी भिंतीवरील क्रिकेट कसोटी वीरांच्या फोटोंची मोडतोड केली. जार्डिन, हॅमंड, हटन, ब्रॅडमन, वुडफुल, कॉलिन्स, इत्यादी क्रिकेटवीरांच्या फोटोंची दुरुस्ती करता येण्यापलीकडे नासधूस झाली आहे.

**औषधाच्या रिकाम्या बाटल्या फोडून टाका—**औषधांच्या रिकाम्या बाटल्या डबा-बाटलीवाल्यांना विकल्या जातात आणि बनावट औषधांचे कारखानदार त्या बाटल्यांचा गैरवापर करतात. म्हणून डॉक्टरांनी आणि गृहिणींनी रिकाम्या बाटल्यांचा निकाल लावावा, अशी सूचना ड्रग कंट्रोलर श्री. रामचंद्रन ह्यांनी केली आहे.

**आठपानी पुस्तकाला ४ रुपये !—**आदिवासी शाळकरी मुलांना वाटण्यासाठी ओरिसा सरकारने एका आठपानी पुस्तकाच्या प्रत्येक प्रतीला ४ रुपये देऊन एक लक्ष प्रती खरेदी केल्या.

**बिअरच्या किमतीमध्ये वर्णभेद —**काव्हेन्ट्री ( इंग्लंड ) येथे भारतीय–पाकिस्तान्यांची बरीच वस्ती आहे. तेथील एक हॉटेलवाला श्वेतवर्णीयांना १८ पेन्सना एक पाइंट बिअर देतो, पण कृष्णवर्णीयांकडून ३० पेन्स घेतो. “गोऱ्या गिऱ्हाइकांना काळ्या गिऱ्हाइकांचे वावडे आहे, आणि मला धंदा करायचा आहे. जरूर तर मी त्यासाठी तुरुंगवासही पत्करीन” असे हॉटेलवाल्याचे म्हणणे आहे.

**निर्वासित शिंप्याला इंग्रज बाईची मदत—** युगांडाहून नंदलाल मेहता हा इंग्लंडमध्ये गेला, तेव्हा त्याने शिवणाचे मशीन बरोबर आणले. त्याची ४० रुपये जकात भरणे त्याला अशक्य झाल्यामुळे कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी ते जप्त केले. कुमारी रोजमेरी हॉले जारमन ह्या कादंबरीकर्तीने ही जकात भरून मशीन सोडविले.

**वृत्तपत्रांच्या प्रसाराची आवश्यकता—** अविकसित देशांतील प्रत्येक १०० लोकांमागे वृत्तपत्रांच्या १० प्रती, असे प्रमाण युनेस्कोने सुचविले. भारतात हे प्रमाण १·२ प्रती, एवढे पडते. न्यूजप्रिंट कागदाचा तुटवडा, ही वृत्तपत्रांच्या प्रसाराच्या मार्गातील एक मोठी अडचण आहे. वार्षिक २,००,००० टनांची गरज असताना भारतात फक्त ४०,००० टन न्यूजप्रिंट तयार होतो.


# ओगले
## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )



BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth,
BELGAUM

Invest in our “Family Benefit Deposit Scheme” and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

| | |
|---|---|
| S. Y. KAMAT, *General Manager.* | K. B. KIRTIKAR, *Chairman.* |

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ ऑक्टोबर १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## पाकिस्तानच्या लष्कराच्या पुनर्घटनेची सूचना

भारत व पाकिस्तान ह्यांच्यात गेल्या डिसेंबरमध्ये झालेल्या युद्धात पाकिस्तानी लष्कराचा पराभव झालेला नाही असा दावा त्या देशातील कट्टर पाकिस्तानी करीत आहेत. त्यांच्या दृष्टीने पाकिस्तान अजूनही पहिल्याप्रमाणेच सामर्थ्यसंपन्न होऊ शकेल. पण त्यासाठी अधिक जोमदार प्रयत्नांची जरूरी आहे. तथापि पाकिस्तानमधील ‘डॉन’ ह्या पत्रातील प्रमुख साहाय्यक मि. मझहर अली खान ह्यांनी केलेला पाकिस्तानी लष्कराच्या पुनर्घटनेची मागणी वेगळी आहे. ते म्हणतात की पाकिस्तानच्या लष्कराने फक्त संरक्षणाचेच काम करावे. दुसऱ्या कोठल्या तरी देशाच्या जागतिक लष्करी उद्दिष्टांशी त्याला जोडण्यात येऊ नये. सरकारने लष्कराच्या पुनर्घटनेचे काम हाती घेतले पाहिजे आणि तेही देशाचा बदललेला भूगोल व लष्कर भरतीची बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन. लष्कराच्या पुनर्घटनेचा नव्याने विचार करून तिन्ही दलांची शक्ती ठरविण्यात आली पाहिजे. एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे संरक्षण ह्याचा अर्थ संरक्षण असाच करण्यात आला पाहिजे. ह्या पूर्वी संरक्षणाला वेगळा अर्थ देण्यात आलेला आहे. पाकिस्तानच्या लष्करात भूतकाळी बेजबाबदार बडबड फार करण्यात येत असे. दूरच्या कोठल्यातरी शिखरावर निशाण फडकावण्याची अगर दुसऱ्या देशातील एखाद्या किल्ल्यावर पाकिस्तानचा ध्वज उभारण्याची बडबड लष्करी अधिकारी करीत असत. वरिष्ठ लष्करी अधिकारी शिळोप्याच्या वेळच्या गप्पा म्हणून ही बडबड करीत असत असे नाही. देशाच्या संरक्षणाच्या योजना जेथे आखल्या जात असत त्याही ठिकाणी जिभा अशाच मोकळ्या सुटलेल्या असत.

---

## सार्वजनिक मालकीच्या विभागात काम करणे पसंत

उस्मानिआ विद्यापीठाच्या बिझिनेस मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मी नारायण ह्यांनी मॅनेजर वर्गाच्या पसंती-नापसंतीविषयी पाहणी केली. पाहणीवरून असे दिसून आले आहे की बरेच मॅनेजर्स खाजगी उद्योगधंद्यांतून अगर संघटनांतून सार्वजनिक मालकीच्या विभागात पहिल्या नोकऱ्या सोडून जात आहेत. आपल्या नोकरीच्या शाश्वतीची आणि अधिक चांगल्या भविष्याची त्यांना तेथे अधिक खात्री वाटू लागली आहे. पुष्कळांना आगामी कालात होणाऱ्या घटना दिसू लागल्या आहेत. सरकारचे सध्या जे राजकीय आणि आर्थिक धोरण आहे त्याचा विचार करता भविष्यकाळात सार्वजनिक मालकीचा विभाग वाढत जाणार आहे; इतकेच नव्हे तर अर्थव्यवस्थेत त्याचा प्रभाव अधिक पडत जाणार आहे असे त्यांना वाटत आहे. पहिल्या नोकऱ्या सोडताना नव्या नोकरीत कमी पगार मिळाला तरीही कित्येकांनी तो पत्करला आहे. ३० ते ४४ वर्षे वयाचे मॅनेजर्स नोकरीत बदल करण्यास मुळीच कचरत नाहीत. डॉ. लक्ष्मी नारायण ह्यांनी केलेल्या पाहणीत ४७ औद्योगिक संघटनांतील ६४० मॅनेजर्सचा समावेश केलेला होता. गेल्या पाच वर्षांत ज्यांनी आपल्या पहिल्या नोकऱ्या सोडल्या. त्यांच्या पगारांची श्रेणी मासिक ७५० ते १,२५० रुपयांपर्यंत अगर अधिक होती. ६४० मॅनेजर्सपैकी २४४ खाजगी उद्योगधंद्यातील होते, २०१ सरकारी नोकरीतील होते व १५२ जणांनी काही काळ सार्वजनिक संघटनांत काम केलेले होते. खाजगी क्षेत्रातून सार्वजनिक क्षेत्रात आलेल्या मॅनेजर्सपैकी १३५ जण कमी पगारावर आले. बाकीचे मात्र अधिक पगारावर आले.

---

## किडीच्या नाशासाठी डी. डी. टी. चा वापर अयोग्य

शेतातील उभ्या पिकावर अनेक प्रकारची कीड पडते. त्यापासून पिकांचे रक्षण करण्यासाठी डी. डी. टी ह्या रसायनाचा उपयोग भारतात बराच करण्यात येतो. इतर अनेक पुढारलेल्या देशांत मात्र त्याच्या वापरास मनाई करण्यात आली आहे. तेथे कीटक नाशासाठी दुसरे व घातक नसणारे अगर कमी घातक असणारे उपाय करण्यात येतात. डी. डी. टी. चा वापर हा मानवाला आणि एकूण जीवसृष्टीला मारक ठरला आहे. शिवाय त्यामुळे निसर्गातील पंचमहाभूते दूषित होत असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेने आणि जागतिक आरोग्य संघटनेनेही त्याच्या वापरावर निर्बंध असावे असे सुचविले आहे. ज्या किडीविरुद्ध डी. डी. टी. वापरतात त्यांचा नाशही आता होईनासा झाला आहे. कारण, त्या कीटकांनी औषधाशी मुकाबला करून आपले अस्तित्व टिकवून धरले आहे. मलेरिआचा प्रसार करणारे ३२ जातींचे डास आणि २०० इतर कीटक ह्यांनी जणू काही नवी कवचकुंडले स्वतःच तयार करून परिधान केलेली आहेत. भारताने डी. डी. टी. चा वापर बंद केला तर पिकांचा फार मोठ्या प्रमाणावर नाश होईल. परंतु एका हिंदी जीवशास्त्रज्ञाने हा धोका पत्करूनही डी. डी. टी. चा वापर रद्द करावा असे सुचविले आहे.

---

## दारिद्र्य आणि क्रीडाकौशल्य

### ऑलिंपिक सामन्यांचे उद्बोधक निकाल

क्रीडाक्षेत्रातील कर्तृत्वाचा आणि सामाजिक-आर्थिक रचनेचा काही निश्चित संबंध आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेले देश हे क्रीडाक्षेत्रातही एका वेगळ्याच युगात रेंगाळत मागे पडलेले आहेत!

मेक्सिको व म्युनिक येथे झालेल्या गेल्या दोन ऑलिंपिकवरून काही निष्कर्ष स्पष्टपणे काढता येतात. समुद्रसपाटीपासून खूप उंचावर असलेले मेक्सिको आणि तसे नसलेले म्युनिक येथील वेगवेगळ्या हवामानात युरोप-अमेरिका-ऑस्ट्रेलिया-जपान या संपन्न दुनियेने ऑलिंपिकमधील जवळपास सारी पदके लुटली; पण त्यातल्या त्यात युरोपमधील लोकशाहीवादी देशांपेक्षा एका बाजूने ऑस्ट्रेलिया व दुसऱ्या बाजूने कम्युनिस्ट देशांनी अधिक प्रमाणात! आणि आशिया–आफ्रिका–लॅटिन अमेरिका या अविकसित दुनियेत भारताचा क्रमांक दारिद्र्यात जसा वरचा, तसाच ऑलिंपिकमधील यशात खालचा!

आणि ही तुलना तर अधिकच दुःखदायक आहे. गोऱ्या दुनियेच्या तुलनेत भारत मागे पडला, तर त्याचे दुःख होतेच, पण आश्चर्य वाटत नाही. पण अविकसित दुनियेतील काही छोट्या-छोट्या देशांनी मारलेली मजलही आपल्या आवाक्या-बाहेरची का असावी!

केनिया, युगांडा, इथिओपिया, जमेका, क्युबा, आदी देशांतील ॲथलेटनी; क्युबा व केनिया यांच्या मुष्टियोद्ध्यांनी; मंगोलिया, इराण व कोरिया यांच्या पेहेलवानांनी; उत्तर कोरियन निशाण-बाजांनी व क्यूबन बास्केटबॉलपटूंनी आज जगातील अव्वल खेळाडूंत स्थान मिळविलेले आहे आणि बिगर-ऑलिंपिक खेळां-बाबत बोलावयाचे झाल्यास ब्राझिलने खुल्या फुटबॉलमध्ये आणि इंडोनेशिया-मलेशिया-थायलंड यांनी बॅडमिंटनमध्ये असाच दबदबा निर्माण केलेला आहे. पण या सर्व देशांच्या एकत्रित लोकसंख्येच्या पाच पटीने मोठ्या असलेल्या भारताला मात्र आपल्या प्रभावाची अशी किती क्षेत्रे निर्माण करता आली आहेत!

हे अपयश व हे मागासलेपण लांछनास्पद आहे, याबाबत भारतातील सर्व सत्ताधारी पुढाऱ्यांत एकमत आहे!

—वि. वि. करमरकर, महाराष्ट्र टाइम्स; २४-९-७२

---

**सुधीच्या रक्तदानात चंदीगड पुढारलेले** — भारतीय स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापनाच्या निमित्ताने चंदीगड येथे रक्तदानाविषयी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. लोकांनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढे यावे म्हणून चंदीगड येथे एक संस्था स्थापन झालेली आहे. संस्थेतर्फे होणारे कार्य लक्षात भरण्यासारखे आहे. चंदीगड शहरातील रुग्णांना लागणारे रक्त स्वेच्छेने पुढे आलेल्या रक्तदात्यांकडूनच मिळत आहे. त्यामुळे या रक्ताचा दर्जा चांगला असतो. व्यावसायिक दात्यांकडून घेतलेल्या रक्तात धोका संभवतो.

## काही ठळक निष्कर्ष

### आर्थिक दृष्ट्या संपन्न देश हेच क्रीडाक्षेत्रातही अग्रेसर

| | दरडोई वार्षिक उत्पन्न | लोकसंख्या | मेक्सिको+म्युनिक ऑलिंपिकमधील पदके |
|---|---|---|---|
| अमेरिका | ३२,००० रु. | २०·३ कोटी | १०८+९४ |
| रशिया | ९,००० रु. | २४ कोटी | ९१+९९ |
| जपान | १०,७७५ रु. | १०·२ कोटी | २५+२९ |
| झेकोस्लोवाकिया | १०,२७५ रु. | १·५ कोटी | १३+८ |
| भारत | ८२५ रु. | ५२·६ कोटी | १+१ |
| पाकिस्तान | ८२५ रु. | १२·६ कोटी | १+१ |
| युगांडा | ८२५ रु. | १ कोटी | ३+२ |

### आर्थिक संपन्नता आणि लोकसंख्या ह्यांच्या मानाने काही देशांना खेळांचे प्रेम अधिक असते.

| | दरडोई वार्षिक उत्पन्न | लोकसंख्या | मेक्सिको+म्युनिक ऑलिंपिकमधील पदके |
|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | १७,२५० रु. | १·३ कोटी | १७+१७ |
| कॅनडा | १९,८७५ रु. | २·१ कोटी | ५+५ |
| हॉलंड | १३,२०० रु. | १·३ कोटी | ७+५ |
| बेल्जम | १५,०७५ रु. | १ कोटी | १+२ |
| स्वीडन | २२,०५० रु. | ८० लाख | ४+१९ |
| स्वित्झर्लंण्ड | २०,२५० रु. | ६३ लाख | ५+३ |
| डेन्मार्क | १७,३२५ रु. | ५० लाख | ८+१ |
| फिनलंड | १४,७५० रु. | ५० लाख | ४+८ |
| नॉर्वे | १६,२०० रु. | ३८ लाख | २+४ |

### आशिया-आफ्रिका-लॅटिन अमेरिका या अविकसित देशांचे भारताला लाजविणारे यश

| | दरडोई वार्षिक उत्पन्न | लोकसंख्य | मेक्सिका+म्युनिक ऑलिंपिकमधील पदके |
|---|---|---|---|
| भारत | ८२५ रु. | ५२·६ कोटी | १+१ |
| पाकिस्तान | ८२५ रु. | १२·६ कोटी | १+१ |
| जमेका | ४,१२२ रु. | १९ · कोटी | १+१ |
| मंगोलिया | ३,४५० रु. | १३ लाख | ४+१ |
| युगांडा | ८२५ रु. | १ कोटी | २+२ |
| क्यूबा | २,१०० रु. | ८५ लाख | ४+८ |
| इराण | २,६२५ रु. | २·२५ कोटी | ५+३ |
| ब्राझिल | २,०२५ रु. | ९·२ कोटी | ३+२ |
| केनिया | ९७५ रु. | १·२ कोटी | ९+९ |
| मेक्सिको | ४,३५० रु. | ४·९ कोटी | ९+१ |

---

**ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्याची मिळकत**—ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने इंग्लंडचा दौरा केला, त्यापासून ऑस्ट्रेलियाला ६०,००० डॉलर म्हणजे ३·८ लक्ष रु. नफा झाला.

### हिंदमधी घर... फारच जबरदस्त

दक्षिण कोरिआची राजधानी साऊल येथे योजना आणि घरबांधणी ह्याचा विचार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेची प्रादेशिक बठक भरली होती. ह्या बैठकीस भारत सरकारच्या बांधकाम खात्याचे राज्यमंत्री श्री. डी. पी. चट्टोपाध्याय गेले होते. त्यांनी साऊल खेरीज टोकिओ आणि हाँगकाँग ह्या शहरांनाही भेट देऊन तेथील घरबांधणी व घरांची भाडी ह्याबद्दल माहिती करून घेतली. ते म्हणतात की अतिपूर्वेकडील मोठ्या शहरातील घरभाडी जबर नसल्याचे आढळून आले. ह्या शहरातून राहणाऱ्या सामान्य नागरिकाला आपल्या उत्पन्नापैकी १० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम घरभाड्यापोटी द्यावी लागत नाही. हिंदमधील मोठ्या शहरातील परिस्थिती मात्र उलट आहे. घरभाड्यासारख्या एकाच खर्चाच्या बाबीवर भारतामधील शहरनिवासी नागरिकाला आपल्या उत्पन्नाच्या ३० ते ४० टक्के हिस्सा सुद्धा द्यावा लागतो. कारण बेतावाताचे उत्पन्न असलेल्या नागरिकाला सतत वाढत जाणाऱ्या घरभाड्यांचा पाठलाग करावा लागतो. हाँगकाँग ह्या शहरात चीनमधून बाहेर पडणारे नागरिक एकसारखे अनेक मार्गांनी येत असतात. त्यामुळे तेथील गलिच्छ वस्ती कधी हटतच नाही. एक वस्ती उठावी तर थोड्याच काळात दुसरी उत्पन्न होते. चीनमधून आलेले हे निर्वासित पत्र्यांच्या झोपड्या उभारून राहतात. परंतु ह्या झोपड्यातील स्वच्छता नजरेत भरण्यासारखी असते. अतिपूर्वेकडील मोठ्या शहरातून बेकारी जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. ह्या शहरातील लोकांची उत्पन्नेही बरी असतात.

भारतामधील मोठ्या शहरातून राहणाऱ्या कुटुंबांपैकी ६७ टक्के कुटुंबांचे मासिक उत्पन्न सरासरी २०० रुपये अथवा २७ डॉलर्स असते. ह्या मानाने साऊल, टोकिओ व हाँगकाँग शहरातील कुटुंबांचे मासिक उत्पन्न १ हजार रुपयाच्या जवळपास असते. द. कोरिआतील विकासाची कामे मुख्यतः अमेरिकेकडून मिळत असलेल्या द्रव्यसाह्याने चाललेली आहेत. रोजगारी उपलब्ध करून देण्याच्या कामी जपानमध्ये खाजगी उद्योगधंदे बरीच कामगिरी करीत आहेत. त्याशिवाय सरकारही नवी विकासाची कामे काढून बेकारांना काम देण्याच्या खटपटीत असते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बांधलेल्या घरांची योग्य दुरुस्ती वेळेवर करून ती सुस्थितीत ठेवणे. जपान, कोरिआ व हाँगकाँग ह्या देशांनी ह्या बाबतीत चांगली कामगिरी केली आहे व करीत आहेत. टोकिओमधील घरांची देखभाल करण्यासाठी घरांच्या घरभाड्यासाठी केलेल्या किंमतीच्या ६ ते ७ टक्क्यांपेक्षा अधिक खर्च येत नाही. उलट दिल्लीतील सरकारी मालकीच्या ९१ हजार राहत्या जागांच्या दुरुस्तीसाठी दरसाल ३·५ कोटी रुपये खर्च येतो. ह्या इमारतीपासून सरकारला दरसाल ३ कोटी रुपये घरभाड्यापोटी मिळतात. म्हणजे दुरुस्तीचा खर्च १०० टक्के झाला! टोकिओ शहरातील ९९·५ टक्के भाड्याची वसुली बिनबोभाट होत असते. भारतात घरभाड्याची वसुली करणे म्हणजे पुष्कळदा मोठी डोकेदुखीच होऊन बसते. भारतामधील मोठ्या शहरातील गलिच्छ वस्त्या नाहीशा करावयाचा एकमेव मार्ग म्हणजे लोकांना ग्रामीण भागात वस्ती करण्यासाठी उत्तेजन देणे हा आहे.

---

### चलनवाढीच्या दुष्परिणामावर उतारा

चलनाच्या फाजील पुरवठ्याने अर्थव्यवस्था कशी जेरीला येते ह्याची तात्त्विक चर्चा करण्याचे अगर ती समजून घेण्याचा प्रयत्न करण्याचे आता कारणच उरलेले नाही. कारण, सर्वसामान्य लोकांना चढ्या किंमतीच्या चटक्यांनी ती चांगली परिचित झाली आहे. प्रश्न आहे तो ह्या रोगाला उतारा कोणता द्यावा हा. अलीकडेच औद्योगिक कामगारांना ८·३३ टक्के बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला व सरकारी मध्यवर्ती नोकरांना महागाई भत्ता वाढविण्यात येणार आहे. इत्यर्थः काही लोकांच्या हाती अधिक पैसा खुळखुळू लागणार आहे. अर्थातच महागाई अधिक भडकण्याची चिन्हे दिसत आहे. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून लोकांची उत्पन्ने, वस्तूंच्या व सवलतीच्या किंमती आणि नफा ह्यासंबंधी काही सूत्रबद्ध योजना आखण्याचा सरकारचा इरादा आहे. आर्थिक व्यवहारात काही तरी शिस्त यावी आणि चलनवाढ काबूत राहावी असा ह्यामागील उद्देश आहे. वाढत्या किंमती रोखण्याच्या दृष्टीने भांडवलावर मिळविण्यात येणाऱ्या नफ्यावर व त्याच्या वाट्यावर मर्यादा घालण्याचे तत्त्व सरकारने मान्य केले आहे. ह्याचा अर्थ असा की कंपन्याकडून जाहीर करण्यात येणाऱ्या नफ्याच्या दरावर मर्यादा घालण्यात येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे अवाच्या सवा मोठ्या पगारावरही बंधन येण्याचा संभव आहे. कंपन्यांच्या कारभार पाहाणाऱ्या वरिष्ठांना नफ्यावर कमिशन देण्यात येत असते. त्यावर बंधन घालण्याचाही विचार चालू आहे. चलनवाढीची सूज उतरण्यासाठी योजण्यात येणारे नवे उपाय कितपत यशस्वी होतात ते काळच दाखवील.

---

### विधिमंडळाच्या इमारतीचे नूतनीकरण

महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाच्या बैठकी मुंबई येथील ज्या इमारतीत भरतात तीत काही बदल करून तिला नवे रूप देण्याची एक योजना तयार करण्यात येत आहे. ह्या कामासाठी ७० लाख रुपये खर्च येणार आहे. दिल्लीमधील लोकसभेच्या इमारतीत जसा एक मध्यवर्ती दिवाणखाना आहे तसा दिवाणखाना मुंबईच्या नूतनीकरण करण्यात येणाऱ्या इमारतीत बांधण्यात येणार आहे. इमारतीच्या सुधारणेचे काम लवकरच सुरू होईल. ते पुढच्या पावसाळ्यापर्यंत चालण्याची शक्यता असल्याने तोपर्यंतच्या विधिमंडळाच्या बैठकी नागपुरात भरविण्यात येणार आहेत.

### हिंदुस्थानच्या ट्रॅन्झिस्टर रेडिओंना युरोपात वाव

पश्चिम युरोपातील अनेक देशांतून भारतात तयार होणाऱ्या ट्रॅन्झिस्टर रेडिओंना चांगली बाजारपेठ मिळण्याची शक्यता आहे. ह्या देशांतील बाजारपेठांतून जपानी रेडिओ त्यांच्या चढत्या किंमतीमुळे कमी प्रमाणात खपू लागले आहेत. ह्या संधीचा फायदा भारतामधील कारखानदारीला घेता येण्यासारखा आहे. जपानी रेडिओत गिऱ्हाइकाला निवड करण्यास अधिक सवड मिळत असे. पण त्यांच्या किंमती भारी आहेत. पश्चिम युरोपातील देशांतून सध्या मध्यम लहरीवर चालणाऱ्या रेडिओंची मागणी वाढत चालली आहे. गेल्या वर्षी भारताने ह्या देशांना ३.५ कोटी रुपयांचे रेडिओ आणि त्यांचे सुटे भाग निर्यात केले. नव्याने उपलब्ध झालेल्या संधीचा फायदा घेण्यात आला तर ही निर्यात तिपटीने वाढू शकेल असा अंदाज करण्यात आला आहे. १९७१-७२ साली भारताने ६ कोटी रुपयांच्या इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्यात केली. चालू वर्षी ही निर्यात ७-८ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. फक्त पश्चिम जर्मनी हा देश घेतला तर तेथे २५ लाख ट्रॅन्झिस्टर रेडिओ खपतात. ही मागणी भरसाठ पुरविण्यासाठी जर्मनीला उत्पादन करता येणार नाही असे नाही. पण तेथील मजुरीचे दर जबर असल्यामुळे उत्पादन करणे परवडत नाही. डेन्मार्कमध्येही १,५०,००० रेडिओ दरसाल खपतात. पश्चिम युरोपातील देश आपली गरज जपान, तैवान, हाँगकाँग, इत्यादी देशांकडून माल आयात करून भागवीत असतात. फ्रान्स व इटाली ह्या देशांतही ट्रॅन्झिस्टर रेडिओंना चांगली मागणी आहे. ही मागणी भागविणे भारताला शक्य आहे. कारण किंमती व दर्जा ह्या दोन्ही दृष्टींनी भारताचा माल चांगला ठरला आहे.

---

### राणा प्रताप अणुशक्ती वीजकेंद्र चालू झाले

राजस्थानात राणा प्रताप सागर धरणानजीक बांधण्यात आलेल्या अणुशक्ती वीजकेंद्रातून उत्तर भारताला लवकरच विजेचा पुरवठा करण्यात येऊ लागेल. ह्या वीजकेंद्राच्या निर्मितीने भारतामधील अणुविजेच्या उत्पादनात नवे युग सुरू झाले आहे असे म्हणावयास हरकत नाही. कारण ह्या केंद्राची उभारणी ही यशस्वी हिंदी इंजिनिअरांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून केली आहे. आराखड्याची कल्पना मात्र कॅनडाने पुरविलेली आहे. तारापूर येथे भारतामधील पहिले अणुशक्ती वीजकेंद्र उभारण्यात आले. त्या स्टेशनचा आराखडा आणि रचना इंटरनॅशनल जनरल इलेक्ट्रिक ह्या अमेरिकेच्या कंपनीने केलेली आहे. राजस्थानमधील दुसरे केंद्र पहिल्या केंद्रापेक्षा काही बाबतींत वेगळे आहे. तारापूरच्या मानाने तेथील वीजनिर्मिती अधिक गुंतागुंतीच्या पद्धतीची आहे. पण ती अधिक भरवशाची आहे असा निर्वाळा देण्यात आला आहे. तारापूर येथील केंद्रात संस्कारित युरेनिअमचा जळणासाठी उपयोग करण्यात येतो. असे अणुइंधन भारतात अद्याप तयार होत नाही. राजस्थानातील केंद्रात देशातच मिळू शकणार नैसर्गिक युरेनिअम वापरण्यात येत आहे. ह्यामुळे राजस्थान केंद्राचा खर्च तारापूरच्या केंद्राच्या मानाने दुप्पट आहे. परंतु अणुइंधनाच्या जळणाचा खर्च मात्र निम्म्याने कमी आहे. दुसरे असे की इंधनाचा पुरवठा करताना तारापूर येथील केंद्र बंद ठेवावे लागते. राजस्थानमधील केंद्राचे कार्य चालू असतानाच इंधनाचा पुरवठा करता येतो. त्यामुळे अर्थातच विजेच्या पुरवठ्यात खंड पडत नाही.

---

### भुत्तो भारताचे देणेकरी

पाकिस्तानचे अध्यक्ष भुत्तो गुजरात सरकारला ४.६४ रुपयांचे देणे लागतात. ह्या देण्याला थोडा इतिहास आहे. प्रे. भुत्तो ह्यांचे वडील मि. शहा नवाझ भुत्तो भूतपूर्व जुनागड ह्या संस्थानचे दिवाण होते. १९४७ साली भारताची फाळणी झाल्यावर त्यांनी सौराष्ट्रातील जुनागड संस्थान पाकिस्तानात विलीन करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. दिवाण असताना जुनागड सरकारच्या गोळवाड्यातून त्यांचेकडे दुधाचा रतीब चालू होता. रु. ४.६४ दुधाच्या रतिबापोटी येणे असतानाच त्यांना जुनागडला घाईगर्दीत रामराम ठोकावा लागला. अर्थात देणे कागदोपत्री तसेच राहिले. नंतर ते सौराष्ट्र सरकारच्या येण्याच्या यादीत घातले गेले. १९६० सालापासून ह्या कर्जाची नोंद गुजरात सरकारच्या दप्तरी होऊ लागली. आजही ती तशीच चालू आहे. हे येणे वसूल होण्याची आशा नाहीच.

---

### हरिजनांना होटेल्स काढण्यास सक्रिय प्रोत्साहन

केरळमधील काँग्रेसजनांनी त्या राज्यांत हरिजनांनी चालविलेली होटेल्स व रेस्टॉरॉं काढण्यास मदत करण्याचे ठरविले आहे. त्यांच्या संघटित पुरस्काराने निघणाऱ्या ह्या खाद्यपेयांच्या दुकानांना सरकारही मदत करणार आहे. ह्या धंद्यासाठी पुढाकार घेणाऱ्या प्रत्येक हरिजनाला २ हजार रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. ही झाली एक बाजू. पण समजा होटेल्स काढल्यावर त्यात लोक येईनासे झाले तर ? त्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. गिऱ्हाइकांच्या अभावी होटेल्स बंद पडू नयेत म्हणून काँग्रेसपक्षीयांनी त्यांना उदार आश्रय द्यावा अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. देशातील अनेक भागांत हरिजनांवर होणाऱ्या अत्याचारांचा शेवट कसा करावा ह्याविषयी उपाय सुचविण्यात येत आहे. त्यातीलच हा एक उपाय.


**"अर्थ"चा दिवाळी अंक**

"अर्थ"चा १९७२ चा दिवाळी अंक नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होईल. जाहिरातदारांनी आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंती आहे.

द. रा. कुलकर्णी
जाहिरात व्यवस्थापक,

## उद्या बघू !

( लेखक : विजय गोखले )

'आज रोख उद्या उधार' ही प्रचलित म्हण आपण वाण्याच्या दुकानात नेहमीच बघतो, पण त्याकडे दुर्लक्ष करून उधारीत माल घेतच असतो. उद्या म्हणजे भविष्यकाल त्यावर अवलंबून राहण्याची आपली आशा मोठी असते. परंतु व्यावहारिक जीवनात जेथे आपणच निर्णय घ्यावयाचे असतात व त्यामुळे दुसऱ्याचा खोळंबा होणार असतो तेथे निर्णय देण्यास दिरंगाई करतो ती मुद्दामून, आळशीपणामुळे की स्वार्थी उद्देशामुळे ?

आमच्या आपल्यांना साहेबांनी बोलावले की ते नेहमी सांगतात–'उद्या बघू'याचा निर्णय घेण्यासाठी साहेब बोलावत आहेत. चालढकल करण्याची सवय इतकी जडलेली असते की एखादे काम सुरू करण्यास आपण शनिवारी सांगितले तर, उत्तर मिळणार – 'साहेब, सोमवारी केले तरी चालेल ना ? किंवा महिन्याचे २२ ते २४ तारखेस सांगितले तर १ तारखेला सुरू करूयाच ! ऑक्टोबर नोव्हेम्बर महिन्यात कामाची सुरूवात करू म्हटल्यास 'जानेवारीपासून' हे उत्तर ठरल्यासारखेच असते. असा हा चालढकलीचा खेळ आपल्या जीवनाचा एक स्थायीभावच होऊन बसलेला आहे.

काही चालढकलीचे प्रकार ह स्वार्थापोटी होत असतात. त्यात मुलाखतीला बोलावलेल्यांना अनिर्णित ताटकळत ठेवणे, बक्षिशीच्या अपेक्षेने किंवा वर्षाच्या सुरुवातीला कॅलेंडरच्या अपेक्षेने चेक अडकवून ठेवणे, साहेबांची भेट घडवून आणण्यासाठी काकू करणे, इत्यादी नानाविध गोष्टी येतात.

दिरंगाई करण्यात सरकारी खाती ही उच्च श्रेणीतील म्हणावी लागतील. एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फाईल जाण्यास किती वेळ लागतो हे सांगणे संबधीत कारकुनाला, नाहीतर परमेश्वरालाच माहित ! निर्णय घेण्याचा वाईटपणा आपल्यावर येऊ नये म्हणून काही उच्चपदस्थ कारकून मंडळी एकतर अद्यापि आपली फाईल आली नाही असे सरळ ठोकून देतात किंवा परवलीचा शब्द 'बघा बुवा ! ( नरो वा कुंजरोवा ) मी फाईल वरती पाठविली आहे' असे सांगून कटवतात.

विलंबाची कारणे सांगताना प्रत्येकजण साहेबांकडे बोट दाखवीत असतो. त्यात पर्यायाने त्या व्यक्तीचे वा संस्थेचे किती नुकसान होत असते हे मात्र चटकन लक्षात येत नाही. आपण उगीच वाईटपणा का घ्या; पुढे येणारा असेल तो निर्णय देईल ह्या समजुतीने काही साहेबांचा निर्णय उशीरा घेण्यामागे हेतू असतो, पण अंती आपण वेळवर निर्णय घेतला नाही म्हणून पुढे येणारा आपल्यालाच दोष देत असतो हे आपणांस कळत नाही का ?

अशा विलंबाविषयी बोलकेच उदाहरण द्यावयाचे झाल्यास थोर उद्योगपती टाटांनी आपल्या एका भाषणात सांगितले की, भारतात उद्योगधंद्याला परवानगी मिळण्यास किमानपक्षी दोन वर्षे लागतात तर मलेशियात दोन वर्षांत उद्योगधंदा सुरू झालेला असतो. विलंबाव्यतिरिक्त नुकसान किती होते त्याला सुमारच राहात नाही. टाटा फर्टिलायझर प्रोजेक्टचा उल्लेख करून त्यांनी सांगितले की हा उद्योग वेळेवर सुरू न झाल्याने दररोज २५ लाखांचे नुकसान होत होते. अर्थात् ह्यामुळे बरेच आरोप-प्रत्यारोप झाले, परंतु महत्त्वाचा मुद्दा येथे निश्चित समजण्यास हरकत नसावी की लांबणीवर टाकलेल्या निर्णयामुळे उद्योगधंद्याचे नुकसान तर होतेच पण राष्ट्राच्या पैशाचाही अपव्यय होत असतो.

करू हो ! बघू हो !! असे म्हणत आपण आपल्या ह्या संवयीने स्वतःचे नुकसान करून घेत असतो. विम्याचे हप्ते, मोटार वा रेडिओच्या परवान्याचे नूतनीकरण, अशी कैक उदाहरणे ह्या संदर्भात सांगता येतील.

संस्थेचा उगम हा एका व्यक्तीतून वा अनेक व्यक्तीतून होत असतो. त्यामुळे व्यक्ती व संस्था ह्या एकमेकांशी इतक्या निगडित झालेल्या असतात की एखाद्या व्यक्तीपायी निर्णयास विलंब लागला तर अंतिम नुकसान हे त्या संस्थेचेच होत असते. किंवा दुसऱ्या बाजूने विचार केला तर संस्थेचे नुकसान हे पर्यायाने कोणा ना कोणा व्यक्तीचे होत असते. तेव्हा निर्णय घेणे हे आपल्यावर अवलंबून असेल तर त्वरित निर्णय घेण्याची सुरुवात केली तर आपणच आपले नुकसान टाळू शकणार नाही का ?

Tomorrow never comes, साहेब !

---

### व्यापारी पिकांच्या विम्याचा उपक्रम

मध्यवर्ती सरकारच्या मंत्रिमंडळात पिकांचा विमा उतरविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यात आला. परंतु त्यासंबंधी कोठलाच निर्णय घेण्यात आला नाही. दरम्यान सर्वसाधारण विम्याचे काम करणाऱ्या कंपन्यांनी राज्यातील निवडक जिल्ह्यांत पिकांच्या विम्याचे काम प्रयोगादाखल सुरू करावे अशी सूचना करण्यात आली आहे. विमाकंपन्या प्रथम व्यापारी पिकांचा विमा उतरण्यास प्रारंभ करणार आहेत. ह्या उपक्रमाच्या आर्थिक बाजूचा अभ्यास करून इतर पिकांनाही विम्याच्या कक्षेत आणण्याच्या प्रश्नाचा साधकबाधक विचार सरकार करणार आहे. तथापि, पिकांच्या विम्याचा विषय सध्या काहीशा नाजूक अवस्थेत आहे. असा विमा सुरू करावयाचा झाल्यास त्याचा खर्च कोणी सोसावा ह्याबद्दल राज्य सरकार आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्यात वाद आहे. संकल्पित योजनेचा सर्व खर्च मध्यवर्ती सरकारने करावा असे राज्यांतर्फे कळविण्यात आलेले आहे. उलट, मध्यवर्ती सरकारचे म्हणणे असे आहे की शेती हा विषय राज्य सरकारांच्या अखत्यारातील असल्यामुळे खर्चाची जबाबदारी प्राधान्यत: त्यांचीच समजली पाहिजे. तरीपण ह्या कामासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मध्यवर्ती सरकारचे शेतीखाते तयार आहे. बाकीचा खर्च मात्र राज्य सरकारांनी उचलण्याची तयारी ठेवली पाहिजे. भारतामधील बहुसंख्य शेतकरी छोटे व गरीब असल्यामुळे विम्याचे हप्ते वसूल करणे अतिशय अवघड जाईल असे खात्याचे मत आहे. शिवाय हवामानाच्या लहरीपणाही विचारात घ्यावा लागेल.

# स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचा परदेश व्यापार

भारतीय उद्योगपतींनी अलीकडील काही वर्षांत आफ्रिकी व आशियायी देशांत १०० हून अधिक संयुक्त प्रकल्प उभारले आहेत. इथिओपिया, केनिया, लिबिया, मॉरिशस, नायजेरिया, सिलोन, इराण आणि मलेशिया या देशांत २२ संयुक्त प्रकल्पांत यापूर्वीच उत्पादनही सुरू झाले आहे. काही भारतीय उद्योगपतींनी तर इंग्लंड, कॅनडा, प. जर्मनी व अमेरिका यांसारख्या प्रगत देशांत संयुक्त प्रकल्प सुरू केले आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारताच्या निर्यातीबाबत गुणवत्ता नियंत्रणाची सुसंघटित स्वरूपात अमलबजावणी होत नव्हती. आज निर्यातयोग्य अशा ८५ टक्के मालाचे कडक पद्धतीने गुणवत्ता नियंत्रण केले जाते व असा माल निर्यात होण्यापूर्वी त्याची पाहणी केली जाते. त्यामुळे गुणवत्ता व सुबकता या दृष्टीने भारतीय उत्पादनास जागतिक बाजारपेठेत चांगला नावलौकिक लाभला आहे. येत्या काही वर्षांत संपूर्ण निर्यात व्यापार गुणवत्ता नियंत्रणाच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने योजना आखण्यात आल्या आहेत.

विविध प्रकारच्या इंजिनिअरिंग मालाच्या निर्यातीत नेत्रदीपक वाढ दिसून आली आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी ३ ते ५ कोटी रुपये किमतीचा माल निर्यात होत असे. आता त्यापासून दरसाल १०० कोटी रु. हून अधिक किमतीचे परकीय चलन भारतास मिळत आहे. इंजिनिअरिंग मालाच्या निर्यातीपासून ५०० कोटी रुपये किमतीचे परकीय चलन मिळावे म्हणून आखलेल्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची अमलबजावणी सध्या चालू आहे.

### सरकारी व्यापारयंत्रणा

परदेश व्यापाराची विशिष्ट क्षेत्रे सरकारकडे घेण्यासाठी उभारलेल्या सरकारी यंत्रणा हे स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. हळूहळू आयात व्यापार हाती घेणाऱ्या सरकारी धोरणानुसार सरकारी क्षेत्रात अनेक नव्या यंत्रणा स्थापण्यात आल्या. त्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मिनरल्स अँड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन, हँडलूम्स अँड हँडिक्राफ्टस एक्स्पोर्ट कॉर्पोरेशन, इंडियन मोशन पिक्चर्स एक्स्पोर्ट्स कॉर्पोरेशन आणि मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशन, यांचा अंतर्भाव आहे.

आयात व निर्यात व्यापार यांची विशेष क्षेत्रे हाताळणाऱ्या आणखी सरकारी यंत्रणा अलीकडील काही महिन्यांत उभारलेल्या आहेत. त्या म्हणजे प्रतिवर्षी १०० कोटी रु.च्या कापसाची आयात करण्यासाठी "कॉटन कॉर्पोरेशन" आणि प्रतिवर्षी सुमारे ३० कोटी रु. च्या कच्च्या काजूची आयात हाताळण्यासाठी "कॅश्यू कॉर्पोरेशन" या होत.

विकसनशील देशाला संपूर्ण प्रकल्पांची निर्यात तसेच प्रगत यंत्रसामुग्रीची निर्यात हाताळण्यासाठी "प्रॉजेक्ट अँण्ड इक्विपमेंट कॉर्पोरेशन" स्थापण्यात आले आहे. चहा निर्यातीपासून मिळणाऱ्या परकीय चलनात वाढ होण्याच्या दृष्टीने पाकिटातून चहाची निर्यात करून या व्यापारास चालना देण्याचे दृष्टीने "टी ट्रेडिंग कॉर्पोरेशन" (चहा व्यापार मंडळ) अस्तित्वात आले आहे. सागरी अन्न अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मरिन प्रॉडक्टस् डेव्हलपमेंट ॲथॉरिटी ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

भारतात गेल्या २५ वर्षांत आंतरराष्ट्रीय बाजार व्यवहाराचे तंत्र, व्यवस्थापकीय व तंत्रशास्त्रीय कौशल्य यात पुष्कळच वाढ झाली आहे. निर्यात व्यापारास चालना देण्यासाठी संस्थात्मक स्वरूपाच्या सोयींची वाढ झालेली आहे. उत्पन्न आणि रोजगार यांचे मान वाढविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या निर्यातीत जोरदार वाढ साधण्याची शक्यता आता वाढली आहे.

---

### देशाचा भ्रामक विकास : दारिद्र्याची सत्यता

"श्रीमंत देश आणि गरीब देश ह्यांच्या संपत्तीमधील तफावत वाढतच चालली आहे. ही तफावत कमी करण्याचा श्रीमंत देशांनी प्रत्यक्ष कृतीने प्रयत्न केला नाही, तर गरीब देशांचा विकास होणे कठीण आहे. विकसनशील देशांनी जमीन करपद्धती, बँकिंग, इत्यादीविषयक आवश्यक ती धोरणे आखून अमलात आणण्यासाठी पुरेसे राजकीय धैर्य दाखविले पाहिजे; तरच आर्थिक सत्तेची वाटणी नव्या प्रकारे होऊ शकेल. भारतातील सुमारे २० कोटी लोकांचे वार्षिक सरासरी उत्पन्न ३०० रुपयांपेक्षाही कमी आहे. सकस अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी भारत केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढवीत राहिला, तर ह्या २० कोटी लोकांना पुरेसे सकस अन्न मिळायला लागायला ३० वर्षेही पुरणार नाहीत. अधिकाधिक सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टाने धोरणे आखल्याखेरीज भारताला दुसरा पर्यायच नाही. देशाचा विकास झाला तरी जनतेच्या जीवनाचा विकासही व्हायला हवा. हरितक्रांती, उत्कृष्ट रस्ते, जेट विमानांच्या उतरण्यासाठी विमानतळांवर सोई, ह्याने गरिबांच्या अती निकृष्ट अवस्थेमध्ये काडीइतकाही फरक पडत नाही."— जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. रॉबर्ट मॅकनामारा ह्यांचे बँकेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या वार्षिक सभेत भाषण.

---

**बोलपटांचा चोरटा व्यापार** — हिंदी बोलपटांची निर्यात करून भारत दरसाल सुमारे ६·५ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळवितो. परंतु चित्रपटांची चोरटी निर्यात करण्यात येत असल्यामुळे ४ कोटी रुपयांच्या परदेशी चलनाला मुकावे लागते. त्याशिवाय हिंदी चित्रपटातील गाण्यांचे ध्वनिमुद्रण करून त्या ध्वनिमुद्रितांचीही चोरून निर्यात केली जाते. त्यामुळे दरसाल ३० ते ४० लाख रुपये परदेशीय चलनाच्या स्वरूपात गमावण्यात येत आहेत. ज्या ज्या ठिकाणी हिंदी लोकांची वस्ती आहे त्या त्या ठिकाणी हिंदी चित्रपटांना मागणी असते. त्यांना हिंदी चित्रपट पाहण्याची फार इच्छा असते.

## गुलामीच्या अनेक तऱ्हा आजही चालू आहेत

संयुक्त राष्ट्र संघटनेने १९५६ मध्ये गुलामीविरुद्ध जाहीरनामा मंजूर केला आहे. ह्या जाहीरनाम्याला ८१ देशांनी आपली मान्यता दिलेली आहे आणि तरीही अजून कितीतरी देशांत या ना त्या प्रकारची, उघड अगर छुपी, गुलामीची पद्धत चालूच आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेत लंडनमध्ये स्थापन करण्यात आलेली गुलामी-विरोधी आणि मानवी हक्क संरक्षक संस्था आपला आवाज उठवीत असते. हे काम करणारा गृहस्थ ब्रिटिश लष्करातून निवृत्त झालेला कर्नलच्या दर्जाच्या अधिकारी आहे. त्याचे नाव आहे मि. पॅट्रिक मॉंटगोमेरी. ते म्हणतात की जगात अजूनही सहस्रावधी लोकांना गुलामीचे जीवन कंठावे लागत आहे. कित्येक स्त्रियांना सक्तीचा वेश्याव्यवसाय पत्करावा लागत आहे. एखाद्या वस्तूप्रमाणे गुलामांची विक्री करणे बेकायदेशीर आहे. परंतु अरबस्थानातील काही देशांत हा प्रकार अजूनही चालू आहे. तेथे गुलामांना घरनौकर म्हणून संबोधण्यात येते इतकेच. दक्षिण अमेरिकेतील एका शहरात मुलांची जाहीर विक्री १९६५ साली करण्यात आली. त्याच वर्षी एका बँकेला असे आढळून आले की तिच्यामार्फत गुलामांची किंमत चुकती करण्यात आली. गुलामी-विरोधी जाहीरनाम्याला मान्यता दिलेल्या एका देशातून हे गुलाम विक्रीसाठी बाजारात आलेले होते हे विशेष. आशिआतील एका देशात शेतकरी गुलामीत जखडलेले दिसून येतात. एखाद्या शेतकऱ्याने त्याच्या हिश्श्याचे अफूचे पीक काढले नाही तर त्याला फटक्याची शिक्षा देण्याची तरतूद तेथे आहे.

अशा शेतकऱ्याला अंगावर तप्तमुद्राही उठवून घ्याव्या लागतात; किंवा त्याचा एखादा अवयव निकामी करण्यात येतो. इतक्यानेही भागत नाही. कधी कधी त्याला घराबाहेरही हुसकून देण्यात येते. ह्याच देशात छोट्या गुलामांची म्हणजे मुलांची खरेदी-विक्री करण्याचे प्रकार चालतात. मुले व मुली बाजारात विकल्या जातात. त्यांच्या देणग्या देण्याचेही प्रकार घडून येतात. बहुतेकांना घरात गुलामाप्रमाणे राबविण्यात येते. मुली असल्या तर त्यांचा कामवासनेची तृप्ती करण्यासाठी उपयोग केला जातो. अशा प्रकाराबद्दल लंडनमधील संस्था जागरूक असते आणि शक्य त्या मार्गांनी त्यांचा प्रतिकारही करण्यात येत असतो. परंतु हे प्रयत्न अपुरे पडतात. इतका हा प्रश्न मोठा व गुंतागुंतीचा आहे. उघड अगर प्रच्छन्न गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी अजून फार मोठ्या प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठी जगाला कितीतरी अधिक वर्षे वाट पहावी लागणार आहे. ह्या बाबतीत वस्तुनिष्ठ दृष्टी स्वीकारण्यात आली पाहिजे. सामाजिक शिक्षण व शिकवण आणि आर्थिक सुधारणा ह्यांची कास धरल्याशिवाय परिस्थितीत सुधारणा होण्याची अपेक्षा करणे अज्ञानाचे म्हणावे लागेल. ह्या प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत सरकारी पातळीवरही प्रयत्न व्हावयास पाहिजेत. ज्या लोकांच्या पाठिंब्यावर सरकारे उभी राहतात त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणण्याचे काम सरकारनेच केले पाहिजे. त्यांनी असा बदल करण्याचा आग्रह धरला पाहिजे आणि जरूर पडल्यास धैर्याने कणखर उपायही योजले पाहिजेत तरच काही सुधारणा दिसू लागेल.

---

## कांद्याच्या औषधी गुणधर्मांचे संशोधन

कांदाभाकर म्हणजे गरिबांचे अन्न समजले जाते. ह्या सामान्य कंदात रोगाला प्रतिकार करण्याची शक्ती आहे असा शोध लखनौ येथील किंग जॉर्ज मेडिकल कॉलेजमधील दोघा डॉक्टरांनी लावला आहे. त्यांच्या मताने हृदयविकार व पक्षघात ह्या दोन रोगांना आळा घालण्याचे काम कांदा करू शकतो. त्यांच्या ह्या शोधाची दखल ब्रिटिश आणि अमेरिकन शास्त्रज्ञांनी घेतली असून कांद्यातील ज्या द्रव्यामुळे उपरोक्त रोगांना पायबंद बसतो ते वेगळे काढण्याची खटपट सुरू झाली आहे. ते द्रव्य कोणतेही असो पण कांदा आहारात ठेवल्यामुळे रक्ताच्या प्रवाहात उत्पन्न होणाऱ्या सूक्ष्म गाठी वितळून जातात हे मात्र निश्चित झाले आहे. आता कांदाभाकर लक्ष श्रीमंतांनी खाण्यास हरकत असू नये.

---

## युद्धामुळे भारताच्या विकासावर परिणाम नाही

गेल्या डिसेंबरमध्ये भारत व पाक ह्यांच्यात झालेल्या युद्धामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर फार ताण पडला. पण ह्या ताणाचा विपरीत परिणाम होऊन भारताच्या विकासाच्या योजनांत फारसा अडथळा आला नाही असा अभिप्राय जागतिक बँकेचे अध्यक्ष रॉबर्ट मॅकनामारा ह्यांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात की बांगला देश स्वतंत्र होण्यापूर्वी भारताला ७ कोटी निर्वासितांनाही पोसावे लागले. पण भारताने हा खर्च सोसला. कारण, खर्च भागविण्यासाठी करांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आले आणि आंतरराष्ट्रीय मदत संघटनांनी भारताला मदतही केली. पाकिस्तानचे विकासकार्यक्रम मात्र अडचणीत सापडले आणि त्यांची पुन्हा आखणी करावी लागली.

---

**वाचनालयाची दुर्दशा** — पश्चिम बंगालमध्ये मुर्शिदाबाद येथील एका भव्य प्रासादात एक अमोल वाचनालय आहे. परंतु वाचनालयाच्या इमारतीची दुरुस्ती होत नसल्याने छपरातून पाणी गळू लागले आहे. ह्या वाचनालयात दुर्मिळ पुस्तकांचा मोठा संग्रह आहे. फिरदोसी ह्या कवीच्या हस्ताक्षरातील काही हस्तलिखितेही त्यात आहेत. ह्या सर्व ग्रंथसंपत्तीचा पावसाच्या पाण्यामुळे नाश होत चालला आहे. ही सर्व मालमत्ता बंगाल सरकारची आहे. पण ते ह्या परिस्थितीबद्दल उदासीन दिसते. आता मध्यवर्ती सरकारने इमारतीची डागडुजी करून तेथे पुस्तके चांगल्या अवस्थेत ठेवण्याचा विचार चालविला आहे.

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
१ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | १०-६-१९७१ रोजी |
| --- | --- |
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३१ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ — कार्यकारी संचालक
श्री. नि. श्री. सपकाळ, एम्. ए., एलएल्. बी., अध्यक्ष



तारेचा पत्ता : "मॉर्गेज" 

दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. ९.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक






हे पत्र पुणे, येथे शिवाजीनगर घ. नं. ११९६/१ [illegible] यांनी छापिले व '[illegible]' ८२१ शिवाजीनगर ( [illegible] ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( [illegible] )